गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे   अंक ९३ वा   बुधवार २१ ऑगस्ट २०२४   पाने ४   किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 93 | Date : 21/08/2024 | blow Wednesday | Page 4 Price 4

### बदलापूर घटनेची अतिशय गंभीर दखल

## आरोपींवर फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालविण्याचे निर्देश

### मुलींवर अत्याचाराची घटना घडल्यास प्रसंगी संस्थाचालकांवर कारवाई करणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : बदलापूर मध्ये एका शाळेत मुलींवर झालेल्या अत्याचाराची अतिशय गंभीर दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली असून अशा घटना घडल्यास प्रसंगी संस्थाचालकांवर देखील कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला आहे. आरोपीला कडक शासन करण्यात येईल, यासाठी जलदगती न्यायालयात तातडीने खटला चालविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी पोलीस आयुक्तांशी देखील चर्चा केली. सखी सावित्री समित्या शाळांमध्ये स्थापन झाल्या आहेत किंवा नाही ते तपासण्याचे निर्देशही त्यांनी दिले बदलापूर पूर्वेतील एका नामांकित शाळेत दोन मुलींवर । पान २ वर





## २१ ऑगस्ट रोजी 'भारत बंद'ची हाक

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती-जमातीच्या आरक्षणाबाबत दिलेल्या निर्णयाला आरक्षण बचाव समितीकडून विरोध केला जातो आहे. त्यापार्श्र्वभूमीवर या समितीकडून उद्या २१ ऑगस्ट रोजी भारत बंदची हाक देण्यात आली आहे. या बंद दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सरकारकडूनही सर्व जिल्ह्यांमध्ये पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

जनसत्ताने दिलेल्या वृत्तानुसार, या बंदला जवळपास सर्वच दलित संघटनांनी पाठिंबा दिला आहे. याशिवाय काही राजकीय पक्षाही या आंदोलनात सहभागी होण्याची शक्यता आहे. बहुजन समाज पक्षानेही या बंदला समर्थन दिलं आहे. या बंदच्या पार्श्र्वभूमीवर सरकारकडून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. संभाव्य हिंसाचार लक्षात घेता, केंद्र सरकारने राज्यांच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांबरोबर व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेतली आहे. यादरम्यान कुठेही हिंसाचार घडू नये यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांना हायअर्लटवर ठेवण्यात आलं आहे.सर्वोच्च न्यायालयाने एससी-एसटी आरक्षणात क्रिमी लेयर तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्याला खरंच त्याची गरज आहे, त्याला आरक्षणात प्राथमिकता मिळावी, यासाठी हा निर्णय देण्यात आल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे. मात्र, न्यायालयाच्या या निर्णयावर मोठा वाद निर्माण झाला. दलित संघटनांकडून या निर्णयाला विरोध केला जातो आहे. हा एकप्रकारे आरक्षण संपवण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप या संघटनांनी केला आहे. याविरोधात संघटनांकडून उद्या मंगळवारी २१ ऑगस्ट रोजी भारत बंदची हाक देण्यात आली आहे.

महत्त्वाचे म्हणजे भारत बंद संदर्भात राज्य सरकारकडून कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आलेली नाही. मात्र, यादरम्यान, रुग्णालयं आणि औषधींची दुकाने यासारख्या आपातकालिन सेवा सुरु राहणार असल्याची माहिती आहे. याशिवाय बँक, सरकारी कार्यालये, शाळाही सुरु राहणार असल्याचही सांगण्यात येत आहे.

## उद्धव ठाकरेंच्या गळ्यात काँग्रेसचं उपरणं, भाजपाची बोचरी टीका मूळ विचारधारा काँग्रेसच्या पायात

**दैनिक यश सिद्धी न्यूज**




मुंबई : मुंबई काँग्रेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राजीव गांधी सद्भावना दिवस कार्यक्रमात एक असं चित्र पाहण्यास मिळालं जे महाराष्ट्र विसणार नाही. या कार्यक्रमात उद्धव ठाकरेंच्या गळ्यात काँग्रेसचं उपरणं पाहण्यास मिळालं. काँग्रेसचे नेते भाई जगताप यांनी हे उपरणं उद्धव ठाकरेंच्या गळ्यात घातलं. त्यानंतर त्यांनी ते काढून ठेवलं. मात्र भाषणात त्यांना याबाबत स्पष्टीकरण द्यावं लागलं. आता यासंदर्भातले फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर भाजपाने उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.

ज्या बाळासाहेब ठाकरे यांची सगळी हयात काँग्रेसी विचारधारेच्या विरोधात गेली, ज्यांच्या विरुद्ध लढण्यासाठी रक्ताचं पाणी आणि हाडाची काडं करून शिवसेना स्थापन केली, रुजवली आणि वाढवली; त्याच बाळासाहेबांचे सुपुत्र उद्धव ठाकरे हे केवळ राजकीय स्वार्थासाठी काँग्रेसचे उपरणे गळ्यात घालून बसले आहेत. आपली मूळची विचारधारा । पान २ वर

## पंढरपूर येथील शिबिरात १ हजार ८३२ दिव्यांगांचा सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी:पंढरपूर उपजिल्हा रुग्णालय येथे दिनांक १९ व २० ऑगस्ट २०२४ रोजी महसूल विभाग, पंचायत समिती पंढरपूर, उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर व दिव्यांग कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तालुक्यातील १ हजार ८३२ दिव्यांग व्यक्तींनी या उपक्रमामध्ये सहभाग नोंदवला.



जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे दोन दिवस तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे तसेच उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश सुडके व वैश्यपायन वैद्यकीय महाविद्यालयाचे तज्ञ डॉक्टर यांच्या उपस्थित हे शिबिर यश्र्वस्वी पार पडले. या शिबिरात दृष्टी दोष २४२, श्रवण दोष ३०७, बौध्दीक अपंगत्व ३८७, अस्थिव्यंग ७८०, लहान मुलांचे व्यंग १२० अशा विविध व्यंगांची तपासणी करण्यात आली असून यामध्ये पात्र लाभार्थ्यांना घरपोच मिळणार प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. दिव्यांगांना शिबिराच्या ठिकाणी येण्यासाठी व जाण्यासाठी वाहन व्यवस्था, व्हीलचेअरची । पान २ वर

## पंढरपूर नगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या मानवतेच्या दृष्टिकोनातून तातडीने सोडविण्यात याव्यात



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी लाखो भाविक नियमितपणे येत असतात. येथील नगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांनी अनेक वर्षे शहरातील साफ-सफाईबरोबरच हाताने मैला उचलण्याचे काम केले आहे. मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांच्या विविध समस्या तातडीने सोडविण्यात याव्यात. पंढरपूर नगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड-पागे समित ीच्या शिफारशींनुसार नियुक्ती देण्यात यावी. त्यासंदर्भातील प्रलंबित वारसांच्या पात्रतेच्या अडचणी सोडविण्यासाठी सोलापूर उपजिल्हाधिकारी आणि पंढरपूरच्या मुख्याधिकाऱ्यांमार्फत वारसा हक्क कागदपत्रे तपासणीसाठी विशेष शिबिर घेण्यात यावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधितांना केल्या.

पंढरपूर नगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठक झाली. बैठकीस माजी आमदार दीपक आबा साळुंखे । पान २ वर

## पत्रकारांच्या मागण्या संदर्भात येत्या ८ दिवसात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेऊ : ना. चंद्रकांतदादा पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील सर्व पत्रकारांच्या समस्या पत्रकार संवाद यात्रेच्या माध्यमातून तसेच प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या प्रस्ताविकातून मी समजावून घेतल्या आहेत. पुढील ८ दिवसात मुख्यमंत्र्यांची वेळ घेऊन आपल्या सोबत स्वतंत्रपणे बैठक करून त्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असे आश्र्वासन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने दिनांक २८ जुलै ते २० ऑगस्ट या कालावधीत पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या दीक्षाभूमी ते मंत्रालय या पत्रकार संवाद यात्रेच्या समारोपप्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राज्याचे पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा, विधान परिषदेच्या नवनियुक्त आमदार पंकजा मुंडे, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्र्वास आरोटे, राज्य समन्वयक संतोष मानूरकर, कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, डिजिटल मिडिया प्रमुख सिद्धार्थ भोकरे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, ज्येष्ठ संपादक किसन भाऊ हासे, कोकण विभागीय अध्यक्ष नितीन शिंदे, कोकण विभागीय कार्याध्यक्ष शैलेश पालकर, विदर्भ विभागीय अध्यक्ष नीलेश सोमाणी, अमरावती अध्यक्ष नयन मुंडे, पश्र्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष सुभाष डोके, पुणे विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल रहाणे, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, प्रसिद्धी समन्वयक भगवान राऊत, राज्य सदस्य संजय फुलसुंदर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. पुढे बोलतांना चंद्रकांत दादा पाटील म्हणाले की, अलीकडच्या काळात माध्यम क्षेत्र हे असंघटित क्षेत्र झाले आहे. मात्र या क्षेत्रातील लोकांसाठी विद्या, वेतन, आरोग्य विमा, पेन्शन, आजारासाठी मदत व त्यांच्या जीवनात स्थैर्य कसे आणतात येईल यासाठी सरकार प्रयत्न करेल. जिल्हा दैनिकांसाठी स्वतंत्रपणे जाहिरात धोरण राबविण्यात येईल तसेच पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची सूचनाही करण्यात येईल. राज्यसभा आणि विधान परिषदेवर जेव्हा पत्रकारांचा प्रतिनिधी घेण्याची तरतूद होईल. तेव्हा त्या विषयावर बोलणे उचित राहील. मात्र वसंत मुंडे




यांना पत्रकारांचे नेते आणि पत्रकार म्हणूनही चांगले भवितव्य आहे असे ते म्हणाले.

राज्याचे पर्यटन विकास मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे या दोघांनीही मला पत्रकार संवाद यात्रेच्या समारोप कार्यक्रमासाठी जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यांच्या आज्ञेनुसार मी या कार्यक्रमास आलो असून मी तुमचा निरोप उपमुख्यमंत्र्यांना सांगेल. पत्रकारांनाही या संवाद यात्रेतून नक्कीच न्याय मिळेल. मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री मुंबईला आल्यानंतर या संदर्भात बैठक घेऊ असे ते म्हणाले, पंकजा मुंडे आपल्या भाषणात म्हणाल्या की, दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा काढल्याबद्दल मी वसंत मुंडे यांचे अभिनंदन करते. त्याचे कारण म्हणजे अशा प्रकारच्या यात्रा फक्त मुंडेंनाच चांगल्या जमतात. गोपीनाथ मुंडे यांनी संघर्ष यात्रा काढली होती. त्यानंतर राज्यात सत्ता परिवर्तन झाले होते. त्यानंतर मी देखील पुन्हा एक संघर्ष यात्रा काढली होती. त्यावेळीही राज्यात सत्ता परिवर्तन झाले होते. आता वसंत मुंडे यांनी पत्रकार संवाद यात्रा काढली आहे. दोन्ही मुंडेंनी काढलेली यात्रा राज्यात सत्ता परिवर्तन घडवून आणणाऱ्या ठरल्या मात्र वसंत मुंडेंनी काढलेली यात्रा आमचं शासन कायम ठेवणारी ठरेल. प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून पत्रकारांच्या सर्व मागण्या मांडल्या. राज्यशासन जर मतांच्या गठ्ठ्यावरच न्याय देण्याच्या भूमिकेत असेल तर एकेक पत्रकार हा मतांचा गठ्ठा आहे. याचा सरकारने विचार करावा असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. सरकारने आमच्याकडे दयेच्या आणि मायेच्या भूमिकेतून पाहावे अशी विनंती ही त्यांनी केली. राज्य प्रेस कौन्सिलची निर्मिती करावी, अर्थसंकल्पात पत्रकारांसाठी तरतूद करावी अशा प्रमुख मागण्या त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून केल्या. राज्य संघटक संजय भोकरे म्हणाले की, पत्रकार संवाद यात्रा झाली आणि पत्रकार देखील चांगल्या प्रकारे संवाद साधू शकतो. हे पत्रकारांनी दाखवून दिले. आपली संघटना टिकली पाहिजे. आपण सर्वजण संघटित आहोत हे आज तुम्ही तुमच्या उपस्थितीने सरकारला दाखवून दिले. राहुल गिरी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विश्र्वास आरोटे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी राज्यभरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

### त्याची मदत होईल...

आश्रमशाळांमधील बारा हजारांवर विद्यार्थ्यांना सरकारकडून कौशल्य विकासाचे धडे दिले जाणार आहेत. त्यात नववी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. गेल्या वर्षी सहा हजार विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे कौशल्य कमावले, असे प्रसिध्द झालेल्या एका बातमीत म्हटले आहे. भारतात बेरोजगारीचा दर वाढत आहे. तो ४५ टक्क्यांच्या आसपास असल्याचे सांगितले जाते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या नुकत्याच प्रसिध्द झालेल्या अहवालातही याविषयी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. बेरोजगारीची अनेक कारणे तज्ज्ञ सांगतात, पदवीधर तरुणांमध्ये किमान कौशल्ये आढळत नाहीत. रोजगाराची क्षेत्रे बदलत आहेत. नवनवीन क्षेत्रे उदयास येत आहेत. गेल्या एक दशकापर्यंत त्याचा अंदाजदेखील व्यक्त केला गेला नसेल. परिणामी भविष्यकाळाचा वेध घेऊन शिक्षण कौशल्ये आणि रोजगार यांची सांगड घातली जावी, असे आवाहन करण्यात येत आहे. रोजगार मिळवण्याबरोबरच तरुणाईने स्वयंरोजगार निर्माण करणे जाणत्यांना अपेक्षित आहे. त्या दृष्टीने कौशल्य विकासाची योजना राबवण्याचा सरकारचा कदाचित तो प्रयत्न असावा, बेरोजगारीवर मात करण्यासाठी रोजगार प्रशिक्षण आणि रोजगार निर्मिती हाच व्यवहार्य उपाय आहे. सरकारी आणि खासगी पातळीवर मुलांची कलचाचणी केली जाते. योग्य प्रशिक्षण मिळाले तर त्यातील अनेकांना त्यांची भविष्याची दारे खुणावू शकतात. वयाच्या त्याच टप्प्यावर १९ प्रकारची कौशल्ये शिकवली जाणार आहे. तथापि त्याकरिता योजनेची नियोजनपूर्वक अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. सरकारी योजनांना 'फाइलबंद' होण्याचा शाप आढळतो. राबवल्या गेल्या तरी योजना राबवली हा शेरा मारणे एवढाच त्यामागचा उद्देश आढळतो, योजनेचा लाभ मिळवण्यासाठी बऱ्याच कागदपत्रांचे भेंडोळे सादर करावे लागते, असा जनतेचा अनुभव आहे. ती कागदपत्रे जमवताना इच्छुकांच्या नाकीनऊ येते. त्यामुळे लाभ नको, पण कागदपत्रे आवर, अशी भावना लोक व्यक्त करतात. या योजनेच्या बाबतीत तसे होणार नाही याची दक्षता सरकारने घेतलीच असेल. सरकारी योजनांची जशी घोषणा केली जाते त्याचप्रमाणे त्या योजनांच्या अंमलबजावणीचा अहवालही जाहीर केला जाईल का? गेल्या वर्षी सहा हजार विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण दिले गेल्याचा दावा केला गेला आहे, पण या आकड्यासोबतच प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये कोणते बदल झाले? हेही जाहीर केले गेले तर बरे! योजनेची विश्वासार्हता वाढायला त्याची मदत होईल.

पान १ वरुन

### आरोपींवर फास्ट ट्रॅक न्यायालयात..

झालेल्या अत्याचाराची माहिती मिळताच मुख्यमंत्र्यांनी तातडीने शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याशी चर्चा केली आणि अशा घटना होऊ नयेत म्हणून कायमस्वरूपी ठोस उपाय योजण्यास सांगितले. ज्या विद्यार्थी किंवा पालकांना अडचणी येत असतील त्यांच्यासाठी प्रत्येक शाळेत एक तक्रार पेटी लावावी अशी सूचना त्यांनी केली. याशिवाय शाळेतील ज्या कर्मचाऱ्यांचा विद्यार्थ्यांशी सातत्याने संपर्क असतो त्यावर बारकाईने लक्ष ठेवणे आणि त्याचा ट्रॅक ठेवणे, त्यांची पार्श्र्वभूमी माहिती करून घेणे गरजेचे आहे.

विद्यार्थिनीना थोडा जरा संशय आल्यास त्यांना तातडीने प्राचार्य, मुख्याध्यापक, किंवा शिक्षकांना न घाबरता निदर्शनास आणून देता आलं पाहिजे अशी यंत्रणा हवी असे मुख्यमंत्री म्हणाले.सर्व शाळांमधील शिक्षक आणि कर्मचारी यांच्याशी संस्थाचालकांनी त्वरित बोलून योग्य ती काळजी घ्यावी. जर संस्थाचालकांची चूक असेल तर प्रसंगी त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल. आज सकाळ पासून बदलापूर रेल्वे स्थानकात नागरिकांकडून उग्र आंदोलन करण्यात आले.. आरोपीला तात्काळ फाशी दया असं आंदोलक म्हणत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी रेल्वे आंदोलकांना शांततेचे आवाहन केले.

### पंढरपूर येथील शिबिरात १ हजार

व्यवस्था, वॉटर प्रुफ मंडप, स्वच्छ पिण्याचे पाणी, नाश्ता, जेवण, स्वच्छता गृह आदी व्यवस्था करण्यात आली होती. दिव्यांगांसाठी असणाऱ्या शासनाच्या विविध योजनांच्या लाभांची माहिती व्हावी यासाठी माहितीचे बुकलेट तयार करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी विविध विभागाच्या वतीने माहितीचे स्टॉल लावण्यात आले होते.

सोलापूर जिल्हयातील तालुकानिहाय ग्रामिण रुग्णालय तथा उप जिल्हा रुग्णालय अशा एकुण २५ ठिकाणी दिव्यांग बोर्डाच्या तज्ञ डॉक्टरां मार्फत एकूण १५ हजार ६६६ व्यक्तींची दिव्यांगत्व तपासणी व निदान करून पात्र दिव्यांगत्व प्रमाणपत्र आणि वैश्र्विक ओळखपत्र स्पिड पोस्टने घरपोच देण्यात येणार आहे. तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या प्रचार प्रसिध्दी करण्यात येणार असून, आशाताई आणि यंत्रणेतील तालुका स्तरावरील संबंधित घटकांसाठी कार्यशाळा घेण्यात आल्या असून प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती मित्राचे संचालक अभिजीत राऊत यांनी दिली.





## इंदापूर पोलीस स्टेशन येथे भाऊ बहिणीच्या नात्याचा उत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

इंदापुर/अतुल सोनकांबळे: रक्षाबंधन तेजपृथ्वी ग्रुपच्या वतीने आनंदात पार पडला.जे कायमच आपल्या लाखो बहिणींचे संरक्षण करतात नेहमी महिलांच्या आपल्या बहिणींच्या संरक्षणासाठी दिवस रात्र एक करतात असे आमचे पोलीस बांधव यांना आज तेजपृथ्वी ग्रुपच्या वतीने राखी बांधून त्यांच्याकडून सदैव आम्हा बहिणींचें कायमस्वरूपी संरक्षण करावे अशी अपेक्षा आणि हीच रक्षाबंधनाची भेट स्वीकारण्यात आली,

माझे पोलीस भाऊ सदैव बहिणींचे रक्षण करतात आणि त्यांनी आमच्या पाठीशी कायमच खंबीरपणे उभे रहावे हे वचन त्यांच्यांकडून आज मी भेट स्वरूपात घेते, असे यावेळी तेजपृथ्वी ग्रूपच्या संस्थापक अध्यक्षा सौ अनिता खरात म्हणल्या, तसेच इंदापूर तालुक्यात हि कायम सर्व धर्म समभाव शांतता लाभावीं, हिंदू मुस्लिम भाई भाई याला कुठेही तडा जाऊ नये,कायमच आपण एकत्र राहावे असेच या रक्षाबंधनाच्या दिवशी सर्वांना त्यांनी आवाहन केले.. या वेळी मोठ्या प्रमाणात पोलिस बांधव, तेजपृथ्वी ग्रूपचे पदाधिकारी, कदम गुरुकुल विद्यालय चे विध्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

### पंढरपूर नगरपालिकेतील सफाई

पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे), नगर परिषद प्रशासनाचे संचालक मनोज रानडे, पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी प्रशांत जाधव, सफाई कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, नगरपरिषदेतील ३६२ पात्र सफाई कर्मचाऱ्यांना योग्य क्षेत्रफळाची घरे उपलब्ध करुन देण्यासाठी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव आणि नगरविकास विभागाच्या सचिवांनी संबंधित विषयाबाबत बैठक घेऊन योग्य तोडगा काढावा. नागरी हिवताप प्रतिरोध योजनेतील कार्यरत अस्थायी पदे पुढे कार्यरत ठेवण्याची कार्यवाही आरोग्य विभागाने करावी. पंढरपूर नगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या १६ पात्र वारसांना नियुक्ती देण्यात आली आहे. तथापि प्रलंबित ६६ वारसांना नियुक्ती प्रकरणी अर्जदारांकडून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होऊ शकली नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. या ६६ वारसांबाबत पुन्हा निर्णय घेण्यासाठी उपजिल्हाधिकाऱ्यांमार्फत विशेष शिबिराचे आयोजन करुन वारसांकडील कागदपत्रे आणि नगरपालिकेकडील कागदपत्रे तपासण्यात यावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

### उद्धव ठाकरेंच्या गळ्यात काँग्रेसचं..

काँग्रेसच्या पायात आणि काँग्रेसचे उपरणे स्वतःच्या गळ्यात, अशी अवस्था आता उद्धव ठाकरे यांची झाली आहे. अशी पोस्ट भाजपाचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केली आहे. तसंच उद्धव ठाकरेंचा काँग्रेसचं उपरणं गळ्यात घातलेला फोटोही पोस्ट केला आहे.

ज्यांच्या विरुद्ध लढण्यासाठी रक्ताचं पाणी आणि हाडाची काडं करून शिवसेना स्थापन केली, रुजवली आणि वाढवली; त्याच बाळासाहेबांचे सुपुत्र uddhavthackeray हे केवळ राजकीय स्वार्थासाठी काँग्रेसचे उपरणे गळ्यात ळिल.ुंळ्ींशी.ले/ थलक्छ्ठीज्ञस३

काँग्रेसच्या आजच्या सद्भावना दिवस कार्यक्रमात उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी उपस्थिती लावली. त्यावेळी काँग्रेस नेत्यांनी उद्धव ठाकरेंच्या गळ्यात काँग्रेस पक्षाचे उपरणं घातलं. काही वेळ ते उपरणं उद्धव ठाकरेंनी तसंच ठेवलं. तसंच हसत हसत त्यांनी नाना पटोले आणि मल्लिकार्जुन खरगेंशी गप्पाही मारल्या. पण नंतर शरद पवारही त्या कार्यक्रमात आले. सुरूवातीला शरद पवारांनी काँग्रेसचे उपरणे घालण्यास नकार दिला. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनीही त्यांच्या गळ्यातील उपरणं काढलं आणि बाजूला ठेवलं.

उद्धव ठाकरे ज्यावेळी भाषणासाठी उभे राहिले त्यावेळी त्यांनी यावर काँग्रेसच्या उपरण्यावर भाष्य केलं. भाषणाची सुरुवात त्यांनी, काँग्रेसचे असलात तरीही जमलेल्या माझ्या बंधूनो, भगिनींनो आणि मातांनो अशी केली. तसंच म्हणाले, मी आज खरंच काँग्रेसच्या कार्यक्रमाला आलो आहे हे बघायला स्वतःला चिमटा काढून पाहिला. काँग्रेसच्या कार्यक्रमाला असल्याने मी गळ्यात गमछा घातला. तुमचा आदर ठेवला, मान ठेवला. पण उद्या याचा नक्की फोटो येणार. तो फोटो यावा यासाठीच मी काँग्रेसचे गमछा गळ्यात घातला होता. मी इकडे तिकडे काय करतो त्यांच्याकडे त्यांचं जास्त लक्ष असतं. कारण समोरच्यांचं काही कर्तृत्व नाही. दाखवा काय दाखवायचं ते. असं उद्धव ठाकरे म्हणाले. असं असलं तरीही भाजपाचे नेते केशव उपाध्ये यांनी बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांची आठवण उद्धव ठाकरेंना करुन दिली आहे.

## आखाड्यात आपण मैदान मारण्यासाठी उतरलो आहे : अभिजीत पाटील

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त टेंभुर्णी येथे 'माढा केसरी २०२४' निकाली कुस्ती मैदानाचे दिनांक १८ऑगस्ट रोजी टेंभुर्णी येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माढा तालुक्यातील सर्व राजकीय पक्षातील नेतेगण तसेच कुस्तीमल्ल, वस्ताद व कुस्तीप्रेमींनी मोठ्या प्रमाणामध्ये गर्दी केली होती.

यावेळी अभिजीत पाटील बोलताना म्हणाले की; विधानसभेच्या आखाड्यात आपण मैदान मारण्यासाठी उतरत आहोत असे स्पष्ट सांगून विरोधकांना टोला लागलेला आहे.कधीकधी जोड नसल्यास अडवून कुस्ती मारावी लागते, कुस्ती हा बुद्धी, चातुर्य, चपळतेचा, साहस्येचा खेळ आहे.

आपणा सर्वांचे प्रेम, आशीर्वाद असेच मिळत राहो ज्याला जे लक्षात



यायला लागले ते घ्यावं आपण या ठिकाणी कुस्ती मैदान मारायलाच आलो आहे असे अभिजीत पाटील यांनी म्हणत माढ्यातून विधानसभा लढवणार असल्याचे संकेत दिले असल्याची कुजबूज माढा मतदारसंघांमध्ये आज दिवसभर पाहायला मिळाली.

यावेळी मोठ्या कुस्तीमध्ये पैलवान महेंद्र गायकवाड विरुद्ध पैलवान आशिष उड्डा यांची निकाली कुस्तीमध्ये पैलवान आशिष उड्डा यांनी आपली बाजी मारून मानाची गदा मिळवली.

याच अनुषंगाने अभिजीत पाटील यांनी माढा मतदारसंघातून गाठीभेटी वर जोर दिला असून माढा तालुक्यात कुस्तीचे मैदान भरवले तर माढा तालुक्यात विविध गावांमध्ये खेळ पैठणीचे कार्यक्रमाचे आयोजन करत आहेत.

## शहापूरमधील महिला भगिनींकडून शासकीय कर्मचारी वर्गाला रक्षाबंधन तर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना पोस्टऑफिस च्या माध्यमातून राख्या पाठवल्या

शहापूर/प्रफुल्ल शेवाळे :महाराष्ट्र सरकारने राज्यातील महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरु केली. या योजनेत पात्र महिल्यांच्या खात्यात दर महिन्याला १५०० रुपये दिले जाणार आहेत. पुण्यात शनिवारी या कार्यक्रमाचा भव्य शुभारंभ झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. त्यानंतर राज्यातील योजनेत पात्र ठरलेल्या महिल्यांच्या खात्यात पैसे येण्यास सुरुवात झाली आहे. जुलै आणि ऑगस्ट अशा दोन महिन्यांचे पैसे महिलांच्या खात्यात जमा झाले आहे. यामुळे राज्यातील विशेषतः ग्रामीण भागातील महिला भारावल्या आहेत.

माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांच्या खात्यात पैसे जमा होऊ लागले. त्यामुळे राज्यभरातील महिलांच्या आनंदाला पारावर उरला नाही. यातून शहापूर तालुक्यातील महिलांनी भावाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेट म्हणून देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हाध्यक्ष ठाणे ग्रामीण च्या सौ. कल्पनाताई तारमळे यांच्या नेतृत्वाखाली सौ. घोलप, कविता कोर, कविता विशे, पडवळ ताई, तसलीम कोतवाल आदी पदाधिकाऱ्यांनी अजितदादा यांना पोस्ट ऑफिस मधून राख्या पाठवल्या आहेत. तालुक्यातील जवळपास २५०-३०० महिला भगिनींकडून लाडक्या भावाला म्हणेज उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना राख्या पाठवल्या गेल्या आहेत.तत्पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी कडून शहापूर पोलीस स्टेशन मधील कर्मचारी, ठढज पोलीस कर्मचारी,तहसीलदार, शासकीय विश्रामगृह मधील कर्मचारी यांना



राख्या बांधून आजचा रक्षाबंधन सण पार पाडला आहे. अजितदादा पवार यांना राख्या पाठविताना आणि शहापूर शहरातील शासकीय कार्यालय कर्मचारी वर्गाला राख्या बांधताना एक अनोखा आनंद महिला भगिनींच्या डोळ्यात दिसत होता.

## भोसे येथे राजू बापू पाटील स्मृती पुरस्काराचे वितरण

पंढरपूर/प्रतिनिधी : भुशी तालुका पंढरपूर येथे जिल्हा परिष परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन माजी सभापती व राजूभाऊ पाटील यांच्या स्मरणार्थ राजू बापू पाटील फाउंडेशन च्या वतीने आयोजित राजीव पाटील स्मृती पुरस्कार वितरण सोहळा आमदार बबनदादा शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व माजी सरपंच शिवते सिंह मोहिते पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला



यावेळी सुधाकर कवडे साहित्यसेवा पुरस्कार करकम गावच्या लेकीचे झाड अभियान पुरस्कार कृष्णा वाघमोडे शैक्षणिक पुरस्कार धनाजी खोत सेवा पुरस्कार देण्यात आले याप्रसंगी कोरमादास कारखान्याचे अध्यक्ष धनाजी साठे सहकार शिरोमणी कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे विठ्ठल कारखान्याची माझ्या अध्यक्ष भगीरथ भालके विकास सोसायटीचे अध्यक्ष रावसाहेब तात्या पाटील विठ्ठलचे माजी संचालक युवराज पाटील राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड गणेश पाटील अतुल खरात अरुण तोडकर पोपट चव्हाण समाधान फाटे मारुती जाधव नितीन खटके शेखर पाटील सीपी बागल दिनकर कदम इत्यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# इटकूर प्रशालेमध्ये रक्षाबंधन आगळ्या वेगळ्या स्वरूपात साजरा





**दैनिक यशसिद्धी न्युज**

कळंब/सुधाकर रणदिवे : जि.प.प्रशाला इटकूर मध्ये दि. २० ऑगस्ट रोजी सर्व मुलींनी प्रशालेतील सर्व मुलांना तसेच शाळेतील सर्व शिक्षकांना राखी बांधून औक्षण केले.

तसेच यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरिदास पावले, सदस्य विनोद गाडे, संजय आरकडे उपस्थित होते. त्यांचेही राखी बांधून औक्षण केले. तसेच यावेळी शाळेतील इको क्लबच्या विद्यार्थ्यांनी शाळेत लावलेल्या वृक्षांना राखी बांधून त्यांचे संवर्धन करण्याची प्रतिज्ञा केली. तसेच झाडाची काळजी घेण्याचे, ग्रीन हाऊस याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत शिंदे सर,व शाळेतील सर्व शिक्षकवृंद,विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# उपविभागीय कार्यालयातील अव्वल कारकुनाची खातीनिहाय चौकशीची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

बुलढाणा/राहुल साबळे : सिनखेडराजा उपविभागीय कार्यालयामध्ये अव्वल कारकून पदावर कार्यरत असलेले शिवाजी पापुलवार कार्यकाळातील शेत रस्त्या संदर्भामध्ये दिलेल्या आदेशाची तसेच त्यांच्याकडे असलेल्या अपंग प्रमाणपत्राची चौकशी करण्यात यावी अशी मागणी सिनखेडराजा देऊळगाव राजा तालुका विकास संघर्ष समितीचे अनिल दराडे यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दि १२ ऑगस्ट रोजी दिलेल्या तक्रार अर्ज द्वारा केली आहे,पुढे नमूद केले आहे की गेल्या पंधरा वर्षापासून अव्वल कारकून हे एकाच ठिकाणी कार्यरत आहे सिनखेडराजा तहसील तेथून परत उपविभागीय अधिकारी कार्यालय इथून परत सिंदखेड राजा तहसील असा त्यांचा घटनाक्रम सुरूच असून गेल्या पंधरा वर्षापासून अनेक नागरिकांशी त्यांचा संबंध असल्यामुळे त्याने अनेक बेकायदा कामे केली आहे तसेच माया सुद्धा जमवली आहे १५ वर्षापासून त्यांची बदली झाली नाही त्यांच्याकडे असलेले अपंग प्रमाणपत्रामुळे त्यांची बदली झाली नसावे त्यामुळे त्यांचे खाते न्याय चौकशी तसेच बनावट प्रमाणपत्राची चौकशी करावी अन्यथा उपोषण करण्यात येईल असा इशारा सिनखेडराजा देऊळगाव राजा विकास संघर्ष समितीने निवेदनात दिला आहे,

महसुल विभाग

# स्वेरीच्या ८ विद्यार्थ्यांची 'कॅपजेमिनी' या कंपनीत निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः 'कॅपजेमिनी' या बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील आठ विद्यार्थिनींची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.




'कॅपजेमिनी' या बहुराष्ट्रीय कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून दीक्षा रणजित ससाणे, निकिता ज्ञानेश्र्वर पोरे, प्रज्ञा अनिल रेपाळ, रोहिणी बिभीषण राऊत, ऋतुजा संजय माने, समृद्धी दत्तात्रय मसलेकर, वैष्णवी संतोष मांडवे व स्वराली श्रीरंग जोशी या आठ विद्यार्थिनींची निवड केली. या विद्यार्थिनींना प्रत्येकी वार्षिक रु.४ ते ७.५ लाखांचे पॅकेज मिळाले आहे. १९९८ साली स्थापन झालेल्या स्वेरी अभियांत्रिकीमधून प्लेसमेंटच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. स्वेरीचे विद्यार्थी आज विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यात आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. 'स्वेरी' मधून विविध कंपन्यात प्लेस होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे सध्याच्या आकडेवारीवरून दिसून येते. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत स्वतंत्रपणे कुशल प्रशिक्षकांद्वारे एप्टीट्युड, कम्युनिकेशन स्कील, टेक्निकल स्कील, विविध सॉफ्टवेअर्स, मॉक इंटरव्युव्ह यांचे प्रशिक्षण दिले जाते. स्वेरीमध्ये वार्षिक परीक्षांचे उत्कृष्ट निकाल, संशोधने, मानांकने, इन्फ्रास्ट्रक्चर याबरोबरच विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून करिअरच्या दृष्टीने सर्वात महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या प्लेसमेंटकडे देखील अधिक लक्ष दिले जाते व मोठमोठ्या कंपन्यांना हवे तसे प्रशिक्षणार्थी विद्यार्थी घडविण्यासाठी प्रशिक्षित तज्ञांकडून उत्कृष्ट मार्गदर्शन केले जाते. या विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. एकीकडे स्वेरीने प्रवेश प्रक्रियेत व वार्षिक परीक्षेच्या निकालात मारलेली गरुड झेप दिसून येते. सदर विद्यार्थिनींना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट व संबंधित विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# मंदिर जतन संवर्धनाची कामे पुरातत्व विभाग, संबधित कंत्राटदारानी वेळेत पूर्ण करावीत

## मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या सूचना

* देवाचे पुरातन अलंकार मूल्यांकन करणे कामी शासनमान्य मूल्यांकनकाराची नियुक्ती,
* आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे बाबत शासनास प्रस्ताव सादर,

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराचे जतन व संवर्धनाचे काम पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली शासन निधीतून सुरू आहे. पुरातत्त्व विभाग व संबधित कंत्राटदारानी सदर कामास गती देऊन वेळेत व गुणवत्तापूर्ण करवीत अशा सूचना मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिल्या. तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे पुरातन अलंकार मूल्यांकन करणे कामी शासन नियुक्त मूल्यांकनकाराची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.



श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीची मासिक सभा आज दिनांक २० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास येथे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी महाराज, संभाजी शिंदे, ह.भ.प.श्री. ज्ञानेश्र्वर देशमुख जळगावकर, अँड माधवी निगडे, ह.भ.प.श्री. प्रकाश जवंजाळ, भागवतभूषण अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प.श्री. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे तसेच सर्व विभागाचे खाते प्रमुख उपस्थित होते.या सभेत मंदिर संवर्धन व जतन कामाबाबत सुरू असलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे बाबत शासनास प्रस्ताव सादर करणे, आस्थापनेवर कर्मचाऱ्यांना धर्मादाय आयुक्त यांनी मंजुरी दिल्यानुसार अनुकंपा नियमावली लागू करणे, मंदिर समितीकडे फौजदारी दाव्यांचे न्यायालयातील कामकाज पाहण्यासाठी शासनामार्फत स्वतंत्र सरकारी वकिलाची नेमणूक करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करणे, पंढरपूर येथे वारकरी संप्रदाय आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र स्थापन करणे बाबत पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व मंदिर समितीची संयुक्त बैठक आयोजित करणे, श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे तसेच पुरातन व दुर्मिळ अलंकार मूल्यांकन करणेकामी पुरुषोत्तम काळे, विष्णू सखाराम ज्वेलर्स मुंबई या शासनमान्य मूल्यांकनकाराची नियुक्ती करणे इत्यादी ठराव पारित करण्यात आले. तसेच विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना कॅबिनेट मंत्री पदाचा दर्जा मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव देखील करण्यात आला.

त्याचबरोबर, दर्शन व्यवस्था, पूजा बुकिंग व्यवस्था, मोबाईल लॉकर पावती इत्यादीसाठी संगणक प्रणाली विकसित करणे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सखोल माहितीची लघु चित्रफीत (डॉक्युमेंटरी) तयार करणे, देणगी देणाऱ्या भाविकांचा येथोचित सन्मान करून श्रींचा प्रसाद देणे, सन २०२५ साठी दैनंदिनी व दिनदर्शिका छापाई करणे इत्यादी निर्णय घेण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. यावेळी मंदिर समितीचे माजी व्यवस्थापक तथा नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड तसेच नवनियुक्त व्यवस्थापक तथा नायब तहसीलदार मनोज श्रोत्री यांचा मंदिर समितीचे सह अध्यक्ष व सन्माननीय सर्व सदस्य महोदयांच्या हस्ते श्रींची मूर्ती व उपरणे देऊन सत्कार करण्यात आला.

# नळदुर्ग आणि परिसरात समाजा समाजात तेड निर्माण करणाऱ्या व जकनी तांडा येथील महादेव मंदीराची विटंबना करणाऱ्या समाज कंटकावर कठोर कारवाई करावी

* याचा मुळ सुत्रधार कोण ? याची सखोल उच्चस्तरीय चौकाशी करावी.
* नळदुर्ग शहरात सकल हिंदु संघटनेचा काळ्या फित लावुन निषेध मोर्चा.

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथून जवळच असलेल्या जकनी तांडा येथे ऐन श्रावण महिन्यात महादेव मंदिराचे कळस फोडून त्यावरील भगवा ध्वज काढून टाकुन हिंदू धर्मियांचे आराध्य दैवत असलेले महादेव मंदिराची विटंबना करून हिंदू धर्मांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत सदरील समाज कंटकांनी जाणीव पूर्वक केल्याची घटना नळदुर्ग जकनी तांडा येथे घडली आहे अशा प्रकारे समाजामध्ये तेड निर्माण करू पाहणाऱ्या व हिंदू धर्मियांच्या भावना दुखावणाऱ्या समाज कंटकावर प्रशासनाने कठोर कारवाई करावी नळदुर्ग आणि परिसरात अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असून या घटनेवर प्रशासनाने आळा घालावा आणि समाजात समाजामध्ये भांडणे लावू पाहणाऱ्या समाज कंटका विरोधात कठोर कारवाई करण्यात यावी आणि या मागील खरा सूत्रधार कोण आहे याची उच्चस्तरीय सखोल चौकशी करावी अशा मागणीचे निवेदन नळदुर्ग ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र भानुदासराव सरोदे यांच्याकडे देऊन तक्रार केली आहे



नळदुर्ग येथील जखमी तांडा येथील महादेव मंदिराचे कळस फोडणाऱ्या व भगवा ध्वज काढून टाकणाऱ्या समाज कंटका विरोधात नळदुर्ग शहरांमध्ये सकल हिंदू संघटनेच्या कार्यकर्त्यांनी नळदुर्ग शहरातून काळ्या फिती लावून या घटनेचा निषेध करत शांत पद्धतीने मोर्चा काढला हा मोर्चा अंबाबाई मठ ते राजमाता अहिल्याबाई होळकर चौक , नगर परिषद रोड माऊली नगर , डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौक , नवी बाजारपेठ , लाल बहादुर शास्त्री चौक , भवानी चौक , चावडी चौक , ते जुनी बाजारपेठ , किल्लागेट पोलीस ठाणे नळदुर्ग येथे शांततेत हा मोर्चा काढण्यात आला या निषेध मोर्चात हजारो कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला सदरील गुन्हे गारावर पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करावी अशा प्रकारची मागणी नळदुर्ग शहरांमध्ये जोर धरीत आसुन त्या समाज कंटकाचा शोध घेऊन त्याला तात्काळ अटक करावी आगर आसे नाही झाल्यास सकल हिंदू संघटना तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सकल हिंदू संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे अशा प्रकारचे निवेदन माननीय केंद्रीय गृहमंत्री भारत सरकार ,माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य माननीय गृहमंत्री महाराष्ट्र राज्य , धाराशिव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार केली आहे .

# स्वातंत्र्य दिनानिमित्त 'कर्मवीर'मध्ये राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेटचे दिमाखदार संचालन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात अष्ट्याहत्तरावा भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांच्या हस्ते ध्वजाचे पूजन करण्यात येवून ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी लेफ्टनंट डॉ. समाधान माने, क्रीडा शिक्षक प्रा. विठ्ठल फुले उपस्थित होते. राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेटनी यावेळी दिमाखदार संचलन करून तिरंगा ध्वजास मानवंदना दिली.



महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर संपन्न झालेल्या ध्वजारोहण समारंभात राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेटनी केलेल्या संचलनाचे परेड कमांडर म्हणून सिनिअर ऑफिसर पृथ्वीराज गुरव, प्लाटून कमांडर ज्युनिअर अंडर ऑफिसर सुरज पवार, कंपनी सार्जंट मेजर सोहम झांबरे, सिनिअर अंडर ऑफिसर श्रेया संगीतराव आणि ज्युनिअर अंडर ऑफिसर सिद्धी लिगाडे यांनी उत्तम प्रकारे नेतृत्त्व केले.

ध्वजारोहण समारंभास महाविद्यालयातील कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, शास्त्र विभागाचे उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, कॉमर्स विभागाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे, जुनिअर विभागाचे उपप्राचार्य प्रा. विठ्ठल काटकर, सिनिअर, ज्युनिअर व व्होकेशनल विभागातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी, माजी सेवक, रयत प्रेमी व पालक हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी अडतीस महाराष्ट्र बटालियन एनसीसी सोलापूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल मुथाप्पा अँडम, ऑफिसर कर्नल विक्रम जाधव आणि सुभेदार मेजर अरुण कुमार ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमर कांबळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षकेतर सेवकांनी परिश्रम घेतले.

# टाकळीवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते अनिल कांबळे (बापू) यांचे कार्य कौतुकास्पद

**दैनिक यश सिद्धी न्यूज**



टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील येथील सामाजिक कार्यकर्ते यांचा अनिल कांबळे (बापू) यांचा वाढदिवस २२ ऑगस्ट रोजी असतो. सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे असे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व असून नेहमी अग्रेसर असतात. यांनी २०११ या सालामध्ये बौद्ध विहार मध्ये गौतम बुद्धांच्या मूर्ती प्रतिष्ठापना पुढाकार घेऊन पूर्णत्वास नेले. २०११ पासून प्रत्येक वर्षी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यामध्ये नेहमी पुढाकार. सामाजिक न्याय विभागाकडे आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या सहकार्याने संविधान भवन साठी प्रस्ताव सादर केला. ग्रामपंचायत माध्यमातून बौद्ध विहार मध्ये साऊंड सिस्टिम मंजूर केला. प्रत्येक वर्षी कांबळे परिवाराकडून वृद्धाश्रम व अनाथ आश्रम येथे फराळाचे वाटप केले जाते. २०२४ या वर्षी रामा बेडक्याळे, संजय दळवी गुरुजी, व छाया कांबळे मॅडम व लोकवर्गणीतून समाजासाठी भांडी सेट मिळवण्यासाठी पुढाकार घेऊन पूर्ण केले. समाजकार्याचा वसा घेतलेले असे व्यक्तिमत्व असून यांच्या कार्याची चर्चा गावावर असते

# सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या विरोधात प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी बुधवारी इंदापूर बंदचे आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

इंदापूर/अतुल सोनकांबळेः भारतीय संविधानाने दिलेल्या अनुसूचित जाती व जमातीच्या आरक्षणामध्ये वर्गीकरण व क्रिमीलेअर लागु करण्याचे अधिकार राज्य सरकारला असल्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१ ऑगस्टच्या निकालाच्या विरोधात प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी अनुसूचित जाती जमातींच्या विविध संघटनांनी पुकारलेल्या उद्याच्या ( दि.२१) देशपातळीवरील बंदला येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती व इतर संघटनांनी पाठींबा देवून इंदापूर बंद ची हाक दिली आहे. यासंदर्भातील निवेदन सोमवारी (दि.१९) तहसीलदार जीवन बनसोडे व पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांना देण्यात आले.

याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती इंदापूर शहर,सर्व सामाजिक राजकीय आंबेडकरी संघटना व अनुसूचित जाती, जमाती समाज बांधव यांनी प्रसिध्दीसाठी पत्रक दिले आहे.भारतीय संविधानाने दिलेल्या अनुसूचित जाती व जमातीच्या आरक्षणामध्ये वर्गीकरण व क्रिमीलेअर लागु करण्याचे अधिकार राज्य सरकारला असल्याचा सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेला निकाल धक्कादायक असल्याची प्रतिक्रिया पत्रकात व्यक्त केली आहे. या निर्णयाने याच सर्वोच्च न्यायालयाचा यापुर्वी २००४ साली दिलेला ५ सदस्यीय खंडपीठाचा निर्णय रद्द बातल ठरवला आहे. ५६५ पानांच्या या निर्णयामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसंदर्भात मुद्दे मांडताना घटनाबाहय एडब्ल्यूएस आरक्षणाचा उल्लेख ही करण्यात आलेला नाही. न्यायालयाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना क्रिमीलेअर लावण्याचा निर्णय देवून आरक्षण फक्त एका पिढीपर्यंत असण्याची बाब कोणता ही संविधानिक आधार नसताना टाकलेली आहे, असे या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी रिपाइं चे जिल्हा कार्याध्यक्ष शिवाजीराव मखरे,रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस संदिपान कडवळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष बंटी सोनवणे, माजी नगराध्यक्ष विठ्ठल ननवरे, वंचित चे शहराध्यक्ष सुभाष खरे, राष्ट्रसेवा दलाचे शहराध्यक्ष हनुमंत कांबळे,भारतीय बौद्ध महासभेचे प्रा. बाळासाहेब मखरे, इंडियन लॉयर्स असोसिएशनचे ड. सुरज मखरे,ड. किरण लोंढे,कीर्तीकुमार वाघमारे, उमेश मखरे, पवन मखरे, आशिष चव्हाण, रजनीकांत लोंढे, अक्षय मखरे, सागर जाधव, रोहित मखरे, सुनील पोळ, शंकर मखरे, संतोष मखरे, रोहित मखरे, दर्याराज मखरे, दर्याराज पं. मखरे, सागर शिंदे, सुमित मखरे, रोहित मोहिते, जनार्दन खरे, अजय मखरे,रमेश लोंढे, शुभम कां. मखरे, परमेश्र्वर मखरे, मुकेश मखरे, अमित मखरे, अजय पारसे, सागर जाधव, वंचला मखरे, सुलभा सोनवणे, छाया मखरे, भारती भोसले, अर्चना मखरे, वैशाली मखरे, लतिका मखरे, साईत्रा मखरे यांच्यासह एससी,एसटी प्रवर्गातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उमेद महिला बचतगट अभियानातील बहिणींचे वर्षा शासकीय निवासस्थानी रक्षाबंधन

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बांधल्या राख्या, औक्षणामुळे मंगल वातावरण



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : माझ्या बहिणी राज्याच्या विकासात मोठं योगदान देतात. त्यांना आधार देण्यासाठी जे जे करता येईल ते करेन. आमची ताकद जसशी वाढत जाईल, तशी आर्थिक मदतही वाढवली जाईल,असे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे राज्यातील बहिणींना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच रक्षाबंधनापुर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील दोन हप्ते जमा करण्याचा निर्धारही पूर्ण केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्यातील उमेद अभियानातील महिलांनी मुख्यमंत्र्यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी पोहचून, मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचे औक्षण करून, राख्या बांधल्या. शेकडो बहिणींच्या औक्षण आणि रक्षाबंधनामुळे वर्षा निवासस्थानी मंगल आणि रक्षाबंधनाचे आगळे उत्साही वातावरण होते.राज्यातील ४० हजार गावांतून मुख्यमंत्री श्री. शिंदे यांना एक कोटी राख्या पाठविण्यात येणार आहे. या संकल्पाची सुरवात आज वर्षा निवासस्थानी झाली.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, ही केवळ रक्षाबंधनाची ओवाळणी नाही, तर माहेरचा कायमचा आहेर आहे. मुख्यमंत्री माझी बहीण लाडकी योजनेचे दोन हप्ते रक्षाबंधनापुर्वी माझ्या बहिणींच्या खात्यात जमा व्हावेत, असा आमचा प्रय़त्न होता, तो शब्द आम्ही पाळला. राज्यातील १ कोटी ४ लाख महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. अन्य महिलांच्या खात्यातही हळू हळू आधार सिंडींग आणि तांत्रिक बाबी पूर्ण होताच, पैसे जमा होतील. यातून माझ्या बहिणींच्या संसाराला थोडाफार आर्थिक हातभार लागेल, ही आमची भावना आहे, असेही ते म्हणाले. उमेद अभियानामुळे राज्यात ८४ लाख महिला बचतगटांच्या चळवळीशी जोडल्या गेल्या आहेत. ही संख्या देखील १ कोटीवर न्यायची आहे, सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, आपण सगळ्या बहिणी राज्याच्या विकासात मोठं योगदान देत आहात. तुमच्या उत्पादनांनाही चांगली बाजारपेठ मिळावी असे आमचे प्रयत्न आहेत. मोठमोठ्या मॉलमध्ये, अमेझॉन, फ्लिपकार्ट या प्लटफॉर्मवरही आपली उत्पादने विकली जावीत, यासाठी आमचे प्रय़त्न सुरु आहेत. बसस्थानकावर आपल्या स्टॉल्स जागा मिळावेत, असे निर्देश दिलेच आहेत. विमानतळ आणि रेल्वे स्थानकाबाबत केंद्रांशी संपर्क साधून आहोत. उमेद अभियानातील महिला बचत गटांच्या चळवळीला बळकट करण्यासाठी विशेष बैठक बोलावून उपायोयनजा करण्यात येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

बहिणीनी असेच आमच्या पाठिशी राहावं, सरकारची ताकद जसजशी वाढत जाईल, तसतसे या योजनेतील निधीही वाढवला जाईल. आपण बहिणींनीही आम्हाला ताकद द्यावी असे सांगून मुख्यमंत्र्यांनी या योजनेला बदनाम करणारे, फसवी योजना म्हणणाऱ्यांवर विश्र्वास ठेवू नये असे आवाहन केले. तसेच महिलांसाठी, मुलींसाठी राबवण्यात येणाऱ्या अन्नपूर्णा योजना, लेक लाडकी, लखपती दिदी या योजनांची माहितीही त्यांनी दिली.यावेळी उपस्थित भगिनींनी औक्षण करून, मुख्यमंत्र्यांना राख्या बांधल्या. वर्षा शासकीय निवासस्थानी कार्यरत महिला पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही मुख्यमंत्र्यांना राख्या बांधल्या. याचवेळी एका महिला भगिनीने आपण परभणी येथून आले असल्याचे सांगून मुख्यमंत्री भाऊराया प्रमाणे आपल्या पाठीशी उभे राहिल्याचा आनंद झाल्याचे सांगितले. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनीही या बहिणींचे फुलांच्या पाकळ्यांनी स्वागत केले. मुख्यमंत्र्यांचे वर्षा हे निवासस्थान आलेल्या या सर्व बहिणींचे असल्याची भावनाही व्यक्त केली. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार सर्वश्री दिलीपमामा लांडे, संजय शिरसाट तसेच श्रीमती ज्योती वाघमारे आदी उपस्थित होते.

# सरपंचानी दिला मायेचा आधार



**दैनिक यशसिद्धी न्युज**

ईश्वर वठार /प्रतिनिधीः आज ईश्र्वर वठार गावात अनोखा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी महिलांनी प्रचंड गर्दी केली होती सरपंच व उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य पॅनल प्रमुख यांना राख्या बांधत मायेचा आधार दिला ईश्र्वर वठार येथे अनोखा कार्यक्रम...मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या धर्तीवर सरपंच माझी लाडकी बहीण.. बहिण भावाचे नाते जपणारा पवित्र असा सण म्हणजे 'रक्षाबंधन याच सणाचे औचित्य साधून ईश्र्वर वठार मध्ये आज सरपंच लाडकी बहीण या संकल्पनेतून ग्रामपंचायत ईश्र्वर वठार व लोकनेते गोपीचंद पडळकर फाउंडेशन च्या संयुक्त विद्यमाने भव्य असा रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता.गावातील महिला भगिनींनी सरपंच नारायण भाऊ देशमुख, उपसरपंच विजय अण्णा मेटकरी भाजप किसान मोर्चाचे माऊली हळणवर,ग्रामपंचायत सदस्य भारत पांढरे,अर्जुन घोडके, बाळासाहेब खांडेकर, तसेच राष्ट्रीय समाज पक्षाचे पंकज देवकते, म्हाळापा खांडेकर, अजय देशमुख यांना राखी बांधून बहीण भावाचे नाते जपून एक आदर्श उपक्रम पार पाडला.

यावेळी युवराज देशमुख, हनुमंत लवटे, सुरेश खरात, बाळासाहेब खांडेकर , महेश सरवदे माऊली गुंडगे, डॉ. तानाजी खांडेकर,धनाजी देशमुख, अशोक तरंगे,प्रशांत लवटे, धनाजी सरवदे , सुनील तरंगे, बापू बोरकर हा कार्यक्रम घेण्यासाठी लोकनेते गोपीचंद पडळकर फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष माऊली भाऊ हळणवर, अशोक तरंगे धनाजी देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले तसेच ईश्र्वर वठार मधील माता भगिनी उपस्थित होत्या सरपंच उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्यामार्फत सर्व माता-भगिनींना भेट म्हणून व पर्यावरण संतुलन राहावे यासाठी प्रत्येकी एक झाड भेट दिले.....

# गटविकास अधिकारी सचिन खुडे यांनी स्वातंत्र्याचा पुर्व संधेला इंदापूर तालुक्यातील ग्रामस्थांना दिली सुखद निर्णयाची भेट

**दैनिक यशसिद्धी न्युज**

इंदापुर/अतुल सोनकांबळे : सामाजिक कार्यकर्ता भिमसेन सर्जेराव उवाळे वालचंदनगर, यांनी दिलेल्या जा.क्र/आस्था२/वशि/१४०९/२०२४ इंदापूर दि. १४/०८/२०२४ या उपरोक्त् संदर्भिय विषयान्वये ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी आपल्याला दिलेल्या वेळात ग्रामपंचायत कार्यालयामध्ये हजर राहत नसल्याने ग्रामस्थांची ग्रामपंचायतमधील कामे प्रलंबित रहातात. ग्रामसेवक, ग्रार्मावकास अधिकारी ब-याच वेळा ग्रामपंचायत मध्ये भेटत नाही, गावात येत नाही त्यामुळे ग्रामस्थांची गैरसोय होते.त्यामुळे ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिका-यांना ग्रामपंचायत मध्ये बायोमेट्रिक मशिनवर हजेरी सक्तीची करणेबाबत चे पत्र व सदर पत्रावर केलेल्या कार्यवाही बाबत स्मरण पत्रानुसार आपणास ग्रामपंचायत



कार्यालयामध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणाली कार्यान्वीत करणे बाबत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करणे वावत आदेशीत केले आहे

तरी, संदर्भ क्र.१ ते २ चे तक्रारी अर्ज व संदर्भ क्र.३ नुसार तात्काळ आपले ग्रामपंचायत कार्यालयामध्य बायोमेट्रिक हजेरी प्रणाली कार्यान्वीत करावी व ग्रामस्थांचे तक्रारीचे / शंकाचे वेळेत निरसुण करावे असे आज पत्राद्वारे कार्यतत्पर गटविकास श्री सचिन खुडे यांनी स्वातंत्र्याचा पुर्व संधेला आपल्या सहिने पत्राद्वारे सर्व ग्रामसेवक, ग्रार्मावकास अधिकारी यांना वरिल असा आदेश काढून इंदापूर तालुक्यातील ग्रामस्थाना सुखद निर्णयाची भेट दिली आहे.गटविकास अधिकारी श्री सचिन खुडे यांच्या या आदेशाने इंदापूर तालुक्यातील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातवरण निर्माण झाले असुन आता गावातील ग्रामस्थांची शासकिय कामे ग्रामपंचायत मधिल ग्रामसेवकांच्या उपस्थिती बाबत कोणत्याही अडथळ्याशिवाय त्वरित मार्गी लागतील यासाठी समाधान व्यक्त करुन इंदापूर तालुक्यातून गटविकास अधिकारी यांचे निर्णयाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# दर्शनासाठी शुल्क घेणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल

**दैनिक यशसिद्धी न्युज**


पंढरपूर/प्रतिनिधीः १८ ऑगस्ट रोजी चेतन रविकांत काबाडे राहणार ठाणे हे भाविक श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या दर्शनास आल्यानंतर सुमित संभाजी शिंदे या व्यक्तीने संबंधित भाविकांकडून ४ हजार रूपये ऑनलाईन पेमेंट करून घेतले व संत ज्ञानेश्र्वर दर्शनमंडपातून दर्शनास सोडले. संबंधित भाविकांस पेमेंट केल्याची पावती न मिळाल्याने त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर, त्यांनी रितसर तक्रार नोंदवून पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे सुमित शिंदे यांचेवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याशिवाय, दर्शनमंडप गेटवरील रक्षक सिक्युरिटी कंपनीचे कर्मचारी अभिजीत रघूनाथ मंडळे व शुभम शामराव मेटकरी या दोन्ही कंत्राटी कर्मचा-याने विना परवाना दर्शनास सोडल्याने त्यांचेवर सेवा समाप्तीची कारवाई करण्यात आली आहे तसेच रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस ण्ड सिस्टम्स प्रा. लि, पुणे या कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

तसेच मंदिर समितीच्या वतीने असे आवाहन करण्यात येते की, श्रींचे दर्शनासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती मार्फत कोणतेही शुल्क आकारले जात नाही. दर्शन हे संपूर्णतः निशुल्क आहे.

# अक्कलकोट येथील हजरत शेख नूरुद्दीन चिस्ती रहि, यांच्या उर्सला आजपासून प्रारंभ

**दैनिक यशसिद्धी न्युज**

अक्कलकोट/प्रतिनिधी :अक्कलकोट शहरातील सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान असलेले हजरत शेख नूरुद्दीन चिस्ती रहि, उर्स शरीफ दिनांक २१ ऑगस्ट बुधवारपासून प्रारंभ होणार आहे. दिनांक २१ ऑगस्ट बुधवार रोजी रात्री ठीक दहा वाजता दर्गाचे सज्जादानशीन सय्यदशा नसीरपाशा पिरजादे चिस्ती यांचे पवित्र हस्ते हजरत शेख नुरुद्दीन बाबा मजार(दर्गा) चे गुसुल (अभिषेक) ह्या धार्मिक विधीने उर्ससास सुरुवात होणार आहे. हजरत शेख नुरुद्दीन चिस्ती यांचा ऊस तीन दिवस चालणार आहे. दि.२२ ऑगस्ट गुरुवार रोजी संदल (गंध), दि.२३ ऑगस्ट शुक्रवार रोजी चिराग (दीपोत्सव), दि.२४ ऑगस्ट शनिवार रोजी ज्यारत(प्रसाद वाटप) होणारं आहेः दि.२२ऑगस्ट गुरुवार रोजी संदल गंध संध्याकाळी ७:०० वाजता अक्कलकोट शहरातील रजिअल्लहा दर्गाह येथून निघून अक्कलकोट शहरातील ए वन चौक, विजय कामगार चौक कारंजा चौक मेन रोड फत्तेसिंह चौक बेडर कन्हैया चौक या प्रमुख मार्गावरून गंध मिरवणूक निघून रात्री ठीक १०:० वाजता हजरत शेख नुरूद्दीन बाबा चिस्ति दर्गा येथे पोहोचणार आहे.



त्यानंतर त्यानंतर सदर दर्गाहचे सज्जादानशीन यांचे हस्ते हजरत शेख नुरुद्दीन बाबां यांचे समाधीवर संदल (गंध) चढविण्यात येईल व त्यानंतर प्रसाद वाटप होणार आहे. दि.२३ ऑगस्ट शुक्रवार उर्सच्या मुख्य दिवस रोजी चिराग (दिपोस्तव) चा कार्यक्रम सदर दर्गाहचे सज्जादानशीन सय्यदशा नसीरपाशा सय्यदशा कदीरपाशा पीरजादे चिष्ती यांचे पवित्र हस्ते होणार आहे. संध्याकाळी दर्गायेथे कव्वाली,(कलाम,भजनाचा)बहारदार कार्यक्रम होणार आहे. दि.२४ ऑगस्ट शनिवार रोजी सकाळी १०:०० वाजता जियारत कार्यक्रम संपन्न होणार आहे व त्यानंतर सज्जादानशीन यांचे हस्ते प्रसाद वाटप होणार आहे.

अक्कलकोट शहरातील व तालुक्यातील सर्व हिंदु-मुस्लिम बांधवांनी व सद भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हजरत शेख नुरुद्दीन बाबा चिस्तीचे दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान ट्रस्टचे सज्जादनशीन नासिर पाशा पिरजादे व ट्रस्टचे अध्यक्ष हाजी फजलेरहिमान शादी शाब्दी यांनी केले आहे.

# बारामतीच्या डिजिटल मार्केटिंग आणि पॉडकास्ट स्टुडिओ व्यवसायाला वेगळ्या उंची

**दैनिक यशसिद्धी न्युज**

बारामती/प्रतिनिधीः डिजिटल मार्केटिंग आणि पॉडकास्ट स्टुडिओ व्यवसायाला वेगळ्या उंची वरती घेऊन जाणारी संकल्पना आता बारामती मध्ये इखऊ- अध्यक्ष धनंजय जामदार

वेगाने विकसित होणाऱ्या बारामती मध्ये आणखी नावीन्य आणण्याचे काम फ्युजन इन्फिनिटी सोल्युशनच्या नवीन अत्याधुनिक पॉडकास्ट स्टुडिओच्या माध्यमातून नक्कीच होणार आहे. फ्युजनच्या पाचव्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने बारामती मध्ये पहिल्या वहिल्या पॉडकास्ट स्टुडिओचे उद्घाटन आधुनिकतेने म्हणजे डिजिटल पद्धतीने करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष धनंजय जामदार यांचे वक्तव्य. नेहमीप्रमाणे कात्रीद्वारे फीत कट न करता लॅपटॉप वरील बटन ला क्लिक केल्यानंतर आपोआप कट होणाऱ्या फितला पाहून सर्वच जण अवाक झाले.

प्रॉडक्ट लॉन्चिंग, सर्विसेस ची माहिती, जीवन आधारित इंटरव्यू, कंटेंटिव्ह इंटरव्यू, व्यवसायिक यशोगाथा या सर्वांसाठीच पॉडकास्ट चे अनन्यसाधारण महत्त्व आहे. यासाठी अनेकांना पुणे-मुंबई या ठिकाणी जावे लागत असे. आता बारामती मध्येच अत्याधुनिक पॉडकास्ट स्टुडिओ तयार झाल्याने बारामतीकरांना ही एक नवीन संधी मिळणार आहे.

१८ ऑगस्ट रोजी बारामती या ठिकाणी या अत्याधुनिक पॉडकास्ट स्टुडिओचे उद्घाटन बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे मधील आयव्हीएफ बिजनेस कन्सल्टंट डॉ. मधुर हमीने हे उपस्थित होते त्याचबरोबर अनेकांत इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज बारामतीच्या असिस्टंट प्रोफेसर

डॉ. स्मिता खत्री देखील यावेळी उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे आयोजक फ्युजन इन्फिनिटी सोल्युशन्स चे डायरेक्टर किरण पवार, आकाश रामगिर तसेच संपूर्ण फ्युजन टीम यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे निवेदन शेखर ओहोळ यांनी केले तर आभार प्रदर्शन भूषण पवार यांनी केले.